# पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
# नागपूर जिल्हा (ग्रामिण), नागपूर
# दिनांक २८/११/२०२३ (मंगळवार)

---

**प्राण्यांना निर्दयतेने कत्तलीसाठी नेणा—या आरोपींवर कारवाई**
**३४ जनावरांची सुटका एकुण २६,५२,०००/—चा मुद्देमाल जप्त**
**स्थानिक गुन्हे शाखेची धडक कारवाई**

दिनांक २८.११.२०२३ रोजी उमरेड उपविभाग पोलीस स्टेशन कुही परीसरात स्टाफसह पेट्रोलिंग करीत असता मुखबीर द्वारे खबर मिळाली कि महींद्रा पिकअप मध्ये बेकारदेशीरपणे गोवंश यांना त्यांचे चारा पाण्याची सोय न करता गाडीमध्ये कोंबुन कत्तलेकरीता उमरेड कुही हायवे येथून नागपुर कडे वाहनात घेवुन जात आहे. यावर पंच व स्टॉफ चे मदतीने मौजा पाचगाव शिवारात उमरेड नागपुर हायवे वर नाकाबंदी करून त्याला थांबवुन सदर गाड्यांची पाहणी केली असता, गोवंश क्रुरतेने कोंबुन बांधुन वाहतुक करतांना मिळुन आहे.

नाव आरोपी :— १. निलेश तारांचद फेंडर वय २४ वर्ष रा श्रीनगर जिल्हा भंडारा
२. बबलु कुरेशी रा टेका नाका नागपुर
३. आशिष पुरूषोत्तम पाखमोडे वय २९ वर्ष रा लाखनी भंडारा

**जप्ती माल :— १. महीन्द्रा पिकअप वाहन क्र एम एच ३५ एजे ३१९८, एम एच ४० सीएम ७८१४ एम एच ३६ एए ३०१७ एकुण किमती २४ लाख रूपये**
**२. गोवंश ३४ नग किमंती २,२२,०००/—रू**
**३. ओप्पो कंपनीचा ॲन्ड्राईड मोबाईल फोन किंमती ३०,०००/—रू असा एकुण २६,५२,०००/—रू चा माल**

सदर जप्ती मुद्देमाल वाहनासह पुढील कारवाई कामी पोलीस स्टेशन कुही यांचे ताब्यात देण्यात आले असुन सदर आरोपीविरूध्द येथे कलम ११ (१),घ.ड.च.प्रा.स.का. ५(१), ब, ९ प्राण्यांना निर्दयतेने वागविण्याचा कायदा १५८,१८४,१३०/१७७ मोटर वाहन कायदा सहकलम १०९ भादवि अन्वयें गुन्हा नोंद करण्यात आला असुन पुढील तपास पोलीस स्टेशन कुही करीत आहे.

सदरची कारवाई नागपुर ग्रामीण जिल्हयाचे पोलीस अधिक्षक श्री हर्ष पोद्दार सर (भा.पो.से.), तसेच अपर पोलीस अधीक्षक डॉ. श्री संदीप पखाले, यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री ओमप्रकाश कोकाटे, पोलीस उपनिरीक्षक श्री आशिष मोरखेडे, पोलीस अंमलदार गजेंद्र चौधरी, अरविंद भगत, संजय बांते, मयुर ढेकळे, राकेश तालेवार यांनी पार पाडली.

**सदर कारवाईचा फोटो सोबत जोडला आहे.**







## रेती चोरी करणा—यांवर कारवाई

**पोलीस स्टेशन खापरखेडा** :— अंतर्गत मौजा बाबुलखेळा बस स्टॉप जवळ कामठी १५ किमी पश्चिम, यातील आरोपी चालक हा ट्रॅक्टर क्रमांक एम एच ४० सी ए ७८०२ नी रेती भरून घेऊन जाताना मिळून आल्याने वाहतुकीचा परवाना (रॉयल्टी)बाबत फिर्यादी याने विचारले असता, आरोपीने परवाना नसल्याचे सांगितले, तेव्हा ट्रॉलीमध्ये अंदाजण एक ब्रास रेती चालकाचा मालक फैजान अयुब शेख राहणार पाटण सावंगी यांच्या सांगण्यावरून कोलार नदी पाटण सावंगी नदीच्या पात्रातून शासनाचे महसूल बुळवून स्वत:च्या आर्थिक फायद्या करिता ट्रॅक्टर क्रमांक एम एच ४० सीए ७८०२ किंमत २,००,०००/— रु बिना नंबरची ट्रॉली किमती १,००,०००/— रुपये व ट्रॉलीमध्ये एक ब्रास रेती किंमत ३,०००/— रुपये असा एकूण ३,०३,०००/— रु चा माल मिळून आला.

सदर प्रकरणी सरतर्फे फिर्यादी नामे— सफौ.शंकर काकडे पोस्टे खापरखेडा यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपी नामे—१) शेखर लक्ष्मण भलावी वय ३० वर्ष रा. नवीन वस्ती भेंडाळा सावनेर खापरखेडा २) फैजान अयुब शेख पिंजारी वय २१ वर्ष रा. शिवाजी चौक पाटणसावंगी सावनेर खापरखेडा यांचेविरूध्द कलम ३७९,१०९, भादवी सह कलम ४८(८) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सफौ पवार मो न.९८८११४३९२७ हे करीत आहे.

## जंगलात लावलेला ट्रॅप कॅमेरा चोरी

**पोलीस स्टेशन भिवापूर** **:— अंतर्गत** मौजा रानमांगली जंगल**,** यातील फिर्यादि हा रानमांगली परीसरात उमरेड क—हडंला अभयारण्य उमरेड येथे दोन वर्षापासून कार्यरत आहे. जंगलातील वन्यप्राण्यांच्या हालचालीवर लक्ष ठेवणे करीता जागोजागी जंगलामध्ये कॅनवूड कंपनीचे ट्रॅप कॅमेरे लावलेले होते. फिर्यादि हे हप्त्याचे हप्त्याला मेमरी कार्ड बदलवित असतात. दिनांक २७.११.२०२३ चे १०.०० वा दरम्यान, फिर्यादि मजूरासह मेमरीकार्ड बदलवण्यासाठी गेले असता, तेथे सागाचे झाडावर कॅमेरा नव्हता. परीसरात शोध घेतला असता कॅमेरा मिळाला नाही. कॅनवूड कंपनीचे ट्रॅप कॅमेरा किं. १८०००/—रू. चा कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— दिपक शंकरराव विरूरकर वय ४२ वर्ष रा उमरेड ता उमरेड जि नागपूर यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. भिवापुर येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३७९ भा.द.वि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पो हवा/ प्रविण जाधव पोस्टे भिवापूर हे करीत आहे.

## किरकोळ वादावरून दुखापत

**पोलीस स्टेशन कळमेश्वर** **:— अंतर्गत** मौजा इंदीरानगर झोपडपट्टी फिर्यादीचे राहते घरी १ किमी पश्चिम. २६/११/२३ चे रात्री २१/३० वा सुमारास **यातील** फिर्यादि मिस्त्री काम करून घरी आला असता फिर्यादीचा लहान भाउ हा आई ला माझ्या साळ्याचे सांक्षगंध आहे मला ५,०००/— रू. पाहीजे " असे बोलुन वाद करत होता. त्यामुळे फिर्यादीने त्याचे आईला म्हटले की, याला पैसे दयायचे नाही. आरोपीने फिर्यादीला म्हटले कि तु मधात पडु नको ? याकारणारून आरोपीने फिर्यादीला शिवीगाळ व हातभुक्याने मारहान केली व लोखंडी कवच्याने डोक्यावर मारून जखमी केले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— अशोक निलचंद सहारे वय ३२ वर्ष रा इंदीरानगर झोपडपट्टी कळमेश्वर यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपी नामे— सुभाष निलचंद सहारे वय ३० वर्ष रा इंदीरानगर झोपडपट्टी कळमेश्वर याचेविरूध्द कलम ३२४,५०६ भा.द.वि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पो हवा गंगाधर ठाकरे मो क्र ९९२३९०८३८२ हे करीत आहे.

## इलेक्ट्रीक करंट लागुन मृत्यु

**पोलीस स्टेशन रामटेक_ :— अंतर्गत** महात्मा फुले वार्ड रामटेक. **दिनांक** २७/११/२३ चे १२/०० वा दरम्यान यातील फिर्यादी आपले परिवारासह मोठी बहिण व भाउजी सुशिल डोणरकर असे सर्व परिवारासह घराचे स्लॉपवरील टेरेसवर टिपुर पोर्णिमा चा कार्यक्रम बघण्याकरिता गेले असता, टेरेसवर असतानी आकाश दिवा हवेने फिर्यादीचे घराचे दिशेने येवुन घरासमोरील ईलेक्ट्रीक अल्युमिनियम सर्व्हिस वायर वर आकाश दिवा येवुन अडकल्याने फिर्यादीचे **भाउजी मृतक नामे — सुशिल मंसराम डोणरकर वय ५० वर्ष रा लंकडगंज नागपुर हे टेरेस वर हाताने प्लॉस्टिक पाईप पकडुन आकाश दिवा काढण्याचा प्रयत्न करीत असता, ईलेक्ट्रीक करंट लागला असता उपचारादरम्यान डॉक्टरांनी मृत घोषित केले**

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— फिर्यादी अभय पंजाबराव ठेंगरे वय ३६ वर्ष रा महात्मा फुले वार्ड रामटेक जि नागपुर मो नं ८८०६२३०७६५ यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. रामटेक येथे कलम १७४ जाफौ अन्वयें मर्ग दाखल करण्यात आला. सदर मर्ग चा पुढील तपास पोहवा / भुरे मो नं ७७२२००३६७३ हे करीत आहे.

**पोलीस उपनिरीक्षक भारत थिटे**
**मो क्र ९४२२६१४६३३**
**पोलीस माहीती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण),नागपुर**